माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१४४/२०१८
दि.२६/१०/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.सुरेश सगाजी काळखैर, ..............अपिलार्थी
बी ८९६म काळखैर निवास,
मु.फुलेनगर, पो.मोहोने,
ता.कल्याण, जि.ठाणे.

जनमाहिती अधिकारी तथा, ..................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.सुरेश सगाजी काळखैर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२४/०८/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) आपल्या आस्थापनेवरील रामलिंगम नडेसन यांची एकुण आर्थिक पैशासंबंधी संपुर्ण माहिती मिळावी.

१) १) प्रॉव्हिडंट फंड २) सोसायटी ३) ग्रॅज्युईटी इत्यादि.

२) २) त्याचे बँक लोन २) सोसायटी लोन इत्यादि.

३) एकुण शिल्लक रक्कम किती आहे व किती थकबाकी आहे.

४) एकुण रक्कम आतापर्यंत कोणाला दिली आहे. याची आपल्या दिलेल्या धनादेश तसेच बँकात दाखल केल्याचे ॲफीडेव्हीट, सत्य पुरावे त्याच्या साक्षांकित प्रती मिळणेसाठी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत दि.२४/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यास विलंब झाला असुन तसेच जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.१२/१०/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२६/१०/२०१८ रोजी सायं.०४.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३८९/२०१८ दि.१६/१०/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) हे व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माहिती अधिकार अंतर्गत मला माहिती दिली नसुन टाळाटाळ केली आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असुन अभिलेख निरिक्षणासाठी अपिलार्थी अर्जदारास बोलावण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास अभिलेख निरिक्षणाचा लाभ कार्यालयीन वेळेत देण्यात येऊन निरिक्षणा अंती जी माहिती आवश्यक आहे ती माहिती १० दिवसांत अपिलार्थी अर्जदारास विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.सुरेश सगाजी काळखैर,
बी ८९६म काळखैर निवास,
मु.फुलेनगर, पो.मोहोने,
ता.कल्याण, जि.ठाणे.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.